# पत्र एक आनंद

अंगणात मुलं माझ्या "मामाचं पत्र हरवलं ते आम्हाला सापडलं". हा आपला पारंपारिक खेळ खेळत होती. त्या खेळाची आठवण मला नकळत भुतकाळात घेऊन गेली.

पुर्वी खूप पत्र लिहीली जात. अगदी १५ पैशाचं पोस्टकार्ड असायचं साधं! पण खूप मोठ्या, महत्वाच्या संदेश वहनाचं काम करायचं ते. कधी इनलँड लेटर, कधी पाकीटही यायचे. पोस्टमन काकांची वाट पहात असायचो आम्ही सगळे. आणि आल्यावर त्यांनी फक्त आम्हालाच पत्र दिले तर केव्हा खूप आनंद व्हायचा. त्यावेळी फोन सगळ्यांकडेच नसायचे. मग त्यासाठी वेळ आणि पैसे खर्च करून रांगेत उभे रहाणे नको वाटायचे.

मला लहानपणा पासूनच पत्र लिहायला खूप आवडायचं. खूप हौस होती मला पत्र लिहीण्याची. माहेरी आणि सासरी आल्यावरही सर्वांना पत्र पाठवत असे. ही पत्र लिहीण्याचा आमच्या घरी सगळ्यांनाच छंद, आवड होती. माझ्या वडिलांना मोठ मोठ्या लेखकांची पत्र यायची. वि. स. खांडेकर तर नेहमीच पत्र पाठवत असत आणि मुंबईला आले की वडिलांना हमखास आग्रहाचं आमंत्रण असे भेटण्यासाठी. प्र. के. अत्रेंची माझ्या आत्यांना पत्र यायची. त्यांनी त्यांना बहिण मानले होते. आकाशवाणीच्या वनिता मंडळात तर त्यांच्या पत्र रूपाने नेहमीच संपर्क असे. मुलांच्या सुध्दा शिरीष कणेकरांशी असा संपर्क होता.

पत्रांचे स्वरूप वेगवेगळे असायचं. कधी घरगुती, कधी व्यावसायिक, कधी होशी, तर कधी ऑफीशीयल. कधी आनंद तर कधी दुःखाची.

कोणाच्या मृत्यु झाला तर १५ पैशाच्या कार्डवर अर्ध्या भागातच दुःखद घटना लिहीलेली असायची. आणि ती सगळ्यांनी वाचून मग ते पत्र फाडून टाकायचे असा पुर्वी रिवाज होता. ही दुःखद घटना

कधी अगदी जवळच्या नातेवाइकांना तार द्वारे कळवली जायची व त्यांना त्वरीत संदेश मिळायचा. पण तार आली की मजकूर वाचेपर्यंत खूप भिती वाटायची.

कधी तार आनंदाची वार्ताही घेऊन यायची. कधी नूतन बाळाच्या आगमनाची, कधी विवाह मंगल वार्तेची. तर कधी परीक्षांमध्ये मिळालेल्या घवघवीत यशाच्या अभिनंदनाची. अशा तारा आल्या की आनंदी आनंद असायचा.

काही पत्र अगदी खास असायची बर का! पालकांनी मुला-मुलींच्या लग्न करण्याचा निर्णय घेतला की मग वधु-वर संशोधन पर पत्रव्यवहार सुरु व्हायचा. त्यांचे फोटो-पत्रिका पाठवण्या पासून सुरवात व्हायची. आणि मग त्यानुसार प्रत्यक्ष पाहण्याचा कार्यक्रम, मग एकमेकांच्या चौकशा, पसंती, लग्न तिथी, साखरपुडा, व्याही भोजन यात किती न काय. भरपूर पत्रांचा पाऊस पोस्टात पडत असे.

लग्न ठरून होईपर्यंतचा काळ आणि लग्न झाल्यावर, दोघांच्या विरहाचा काळ यामध्ये मग गुलाबी पत्रांची रोज देवाण-घेवाण करण्याचे काम पोस्टमन काका करीत असत. आताच्या मोबाइल वर बोलण्या पेक्षा त्या वेळच्या या पत्र व्यवहाराची गंमत न्यारी होती. तो एक नजराणाच वाटायचा.

आताच्या सारख्या तेव्हाही राख्या, भेटवस्तू असत. बहिण, भाऊ प्रत्यक्ष भेटू शकले नाहीत तरी पत्ररूपाने भेटत असत. मनिऑर्डर रूपाने दिवाळी, राखी भेट येई. पोस्टमन काका लांबूनच हाक मारत आले की कोणाची तरी मनिऑर्डर आल्याचे समजे. आई मग त्यांच्या जवळ भरपूर फराळाची पुडी घरी मुलांसाठी देई. त्याच बरोबर दिवाळी भेट म्हणून पैसेही द्यायची.

कधी कधी पत्र लवकर मिळावे म्हणून एक्सप्रेस डिलिव्हरीचा पर्याय वापरत. नंतर आला स्पीड पोस्ट सेवा चालू आहे. आता पत्र सेवा कमी पण पोस्टाच्या कामात तत्परता अधिक आल्याचे जाणवते.

पूर्वी नातेवाईक खूप येत असत. त्यांचे येण्या विषयी पत्र आले की खूप आनंद व्हायचा. खूप आवडायचे पाहुणे आलेले आवडायचे. आणि पाहुणे म्हणून जायलाही.

पण आता कळेल की आईला त्यावेळी किती त्रास होत असेल ते.

२५ पैशाचं कार्ड- ग्रीटिंग कार्ड म्हणूनही बऱ्याच वेळा वापरले जायचे. आता पोस्टापेक्षा लोक कुरियरचा अधिक वापर करतात. राख्या, पार्सल हे कुरियर द्वारे येते. त्यामुळे त्याची ठराविक वेळ नसते. आणि त्यांची वाट पाहिली जात नाही.

या डिजीटल क्षेत्रामध्ये आता व्हॉट्सॲप, मोबाइल सुरू झाले. त्याचे तुरंत परिणाम दिसतात. आपण प्रत्यक्ष समोरासमोर बोलतो किंवा मेसेजही क्षणात पोचतात. येवढाच फायदा होतो. पण मेसेजेसची गर्दी खूप झाली की सगळेच डीलीट करावे लागतात. शाश्वत काहीच रहात नाही.

पत्रांचे मोल असे नसले हे। पण नेहमीच यायची, आणि सुरक्षित असायची. त्याचा सोशल मिडिया सारखी लेव्हल भिती नसायची. त्यात प्रेम आपुलकी, जिव्हाळा काळजी, कौतुक, असायचे. आजी पणजी पासून चिमुकल्या पिंटू पर्यंत सर्वांची विचारपूस काळजी असायची. छकुल्याचे कौतुक असायचे.. खूप छान वाटायचे. त्वरीत पत्राचे उत्तर यावे म्हणून काही वेळा जोड-कार्डाचाही उपयोग होत असे. एकाला एक जोडलेल्या एका पत्रावर उत्तर त्वरीत येण्यासाठी आपला पत्ता टाकला जात असे.

पोस्टाच्या संपर्काला वेळ जरूर लागत असे. पण त्यातही एक वेगळीच गंमत होती. त्यात एक ठेवा होता. ती पत्र जपून ठेवली जात. त्यामुळे त्या आठवणींचा ठेवा केव्हाही पुनः पुनः लुटता येतो. पत्र एकटेपणा घालवतात. ती बोलकी असतात. मनीच्या गुपीत सांभाळतात. ह्या आनंदाला मुकलोय आता. याचेच वाईट वाटते. मामाचे पत्र आता खरंच हरवलंय, तेही पुनः न सापडण्यासाठीचं



।।
सौ. उषा शशिकांत पाठक